# २७. आध्यात्मिक अधिकार – श्रेष्ठ मानवाधिकार

१० डिसेंबर हा युनोने जागतिक मानवाधिकार दिवस म्हणून घोषित केला आहे. त्यायोगे मानवाच्या विविध भूमिकेत विविध अधिकारांबाबत भाष्य करण्यात आले आहे. मानवाचे मूळ स्वरूप व मूळ भूमिका आध्यात्मिक आहे. परिणामी, त्याच्या आध्यात्मिक स्वरूपाची जाणीव करून देणे याला शिक्षणात अत्युच्च स्थान असायला हवे. कारण हा त्याचा मूळ अधिकार आहे. आदर्श समाज स्थापनेकरिता याचे महत्त्व अमान्य करता येणार नाही. हे सर्व शिक्षणाच्या माध्यमातून शक्य आहे. कारण शिक्षण हे संस्कृती संक्रमणाचे व सुसंस्काराचे प्रभावी माध्यम आहे.

प्रत्येक राष्ट्राला स्वतःची संस्कृती असते, स्वतःच्या परंपरा असतात. संस्कृती हीच राष्ट्राची खरी ओळख होय. संस्कृती म्हणजे राष्ट्राचे तत्त्वज्ञान, कला, विचारसंपदा, जीवनमूल्य, आदर्श, संस्कृतीमध्ये मानवाच्या बौद्धिक, नैतिक, आध्यात्मिक अंगाचा, मूल्यांचा, उपलब्धीचा प्रामुख्याने विचार होतो. जे जे शाश्वत आहे, सनातन आहे, श्रेष्ठ, उदात्त व आदर्श आहे तेच खरे संस्कृतीचे संचित आहे. श्रेष्ठ तत्त्वज्ञान, श्रेष्ठ कला साहित्य, श्रेष्ठ जीवनमूल्ये, श्रेष्ठ व्यक्तींचे जीवनादर्श हेच संस्कृतीचे सार, हाच प्रत्येक समाजाचा आणि राष्ट्राचा सांस्कृतिक वारसा. क्रोबरने संस्कृतीचे तीन स्तर सुचविले आहेत.

(१) भौतिक स्तर (२) सामाजिक स्तर (३) आध्यात्मिक स्तर. वरील तीनही स्तरांचा विचार केला असता यातील आध्यात्मिक स्तराकडे अद्यापही दुर्लक्ष होत आहे. याचे महत्त्वाचे कारण आधुनिक युगात व्यक्तीमनावर असलेला विज्ञानाचा प्रभाव. विज्ञानाने मनुष्य भौतिकवादी बनला. त्यामुळे शाश्वत सुखाला तो मुकला. खऱ्या सुखाच्या प्राप्तीकरिता तो असमर्थ बनला. स्वतःच्या अंतस्थ क्षमतेचा अर्थात आध्यात्मिक शक्तीचा त्याला विसर पडला. 'मी कोण?' 'माझ्या जीवनाचे प्रयोजन काय?' या मूलभूत प्रश्नाला तो विसरला व त्याऐवजी स्वतःचे भौतिक जीवन कसे समृद्ध करता येईल याकडे तो अधिक आकृष्ट झाला. हे सर्व करीत असताना त्याला या सत्याचा विसर पडला, की भौतिक समृद्धी ही केवळ मृगजळाप्रमाणे भासमान होणारी आहे. क्षणात भासणारी परंतु अस्तित्वात नसणारी, परिणामी आज मानव दुःखाच्या व निराशेच्या अंधारात सुख, शांती व समाधानाचे किरण शोधीत आहे. जीवनाची शांती, सुख व समाधान तो हरवून बसला आहे. यावर उपाय करायचा असेल तर भारतीय तत्त्वज्ञान व भारतीय अध्यात्म पुनरुज्जीवित करावयास हवे. श्रेष्ठतम जीवन मूल्यांचा अंगीकार करावयास हवा. 'सत्यम्, शिवम्, सुंदरम्' ह्या जीवनमूल्यांची देणगी प्राचीन तत्त्वज्ञानाने मानवाला दिली. जे सत्य तेच मंगलमय व

सुंदर आहे. जीवनाचे अंतिम सत्य ज्याने जाणले त्याचे जीवन हे मंगलमय व सुंदर झाल्यावाचून राहणार नाही. मानवी जीवन अध्यात्माने उजळून जायला हवे. पार्थिव बंधनापासून त्याची मुक्तता व्हायला हवी. हे सर्व घडेल केवळ 'यथार्थ शिक्षणा'च्या माध्यमातून, कारण शिक्षण हे संस्कृती संक्रमणाचे प्रभावी साधन व माध्यम आहे.

प्राचीन काळी शिक्षणाचा उदात्त दृष्टिकोन होता. शिक्षण हे केवळ उपजीविका प्राप्त करण्याचे साधन नव्हते तर स्वतःच्या आत्मिक उन्नतीवर भर होता. स्वतःचे स्वरूप ओळखणे व तदनुसार समाजात आचरण करणे, अर्थात 'हे विश्वचि माझे घर' या मानसिकतेवर आरूढ होणे, हा महत्त्वाचा उद्देश होता. त्यामुळे मानवता, करुणा, सेवा, सहिष्णुता या गुणांची जोपासना व संवर्धन होत होते. कारण मानवाचे खरे स्वरूप म्हणजेच 'आत्मस्वरूप.' माझ्यात जे आत्मतत्त्व, जे चैतन्यतत्त्व विद्यमान आहे, तेच समष्टीविश्वात विद्यमान आहे. हा उदात्त दृष्टिकोन समाजात निर्माण होत होता. परिणामी सामाजिक व्यवस्थाही उत्कृष्ट होती. सामाजिक न्यायही अस्तित्वात होता. शिक्षणातून चारित्र्यसंवर्धन, चारित्र्यनिर्मिती घडून येत होती. ज्ञानापेक्षा सद्गुणावर, सदाचारावर, नैतिक वागणुकीवर भर होता. नैतिक मूल्यांचे संस्कार करून चारित्र्य घडविणे हे शिक्षणाचे ध्येय होते. वैयक्तिक विकासासोबत सामाजिक जबाबदारीची जाणीव करून दिली जात होती. कर्तव्यपालनावर भर होता. तात्पर्य, प्राचीन काळी जीवनाची दिशा दाखविणारे, जीवनाला तात्त्विक, नैतिक, आध्यात्मिक अधिष्ठान प्राप्त करून देणारे शिक्षण होते. जीवनाबद्दल सकारात्मक दृष्टीकोन निर्माण करण्याचे, वैश्विक एकात्मता प्रस्थापित करण्याचे सामर्थ्य शिक्षणात होते. कारण मानवी जीवनाचे ध्येय व शिक्षणाचे ध्येय समान होते. मूल्यसंक्रमणाची ती परिपूर्ण व्यवस्था होती.

काळ हा परिवर्तनशील असतो. परिवर्तनशीलता हा काळाचा अपरिवर्तनीय गुण आहे. आज सर्वत्र आधुनिकीकरणाचा, विज्ञानवादाचा, जडवादाचा प्रभाव समाजावर पडला आहे. भौतिकतेने जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात आक्रमण केले आहे. परंतु आधुनिकीकरण म्हणजे पाश्चात्त्यीकरण नव्हे. Indian Education Commission 1962-66 चे विचार याबाबत उद्बोधक वाटतात. "There is no clash between modernization on one hand and social moral and spiritual values on the other. Both must go together."

आज समाजात अनेक ठिकाणी धार्मिक, आध्यात्मिक मूल्यांची पायमल्ली होताना आपणास आढळते. हिंसाचार, अनैतिकता, सांप्रदायिकता, धर्मवेड, भ्रष्टाचार या सर्व घटनांवरून हे सत्य प्रकर्षाने जाणवल्यावाचून राहात नाही, की मानव आपल्यातील मानवत्व हरवून बसला आहे. चारित्र्यसंवर्धन, सामाजिक न्याय, शांतता, आत्मिक विकास ह्या मूल्यांचा त्याला विसर पडला आहे. समाजातील घटकात, विविध स्तरावर हक्काची, अधिकाराची जाणीव प्रत्येकाला आहे. पण त्यामानाने कर्तव्य पालनाबाबत कमालीचे औदासिन्य आढळते. प्रत्येक घटक अधिकाराबाबत जागृत आहे पण कर्तव्यपालनाकडे दुर्लक्ष होत आहे. मानवाच्या अनेक अधिकारांच्या मुळाशी असलेला मूलभूत अधिकार म्हणजे त्याचा आध्यात्मिक अधिकार. आध्यात्मिक अधिकार प्राप्त झाल्यावर त्याला कर्तव्यपालनाची जाणीव होईल. परंतु

हा अधिकार प्राप्त करण्याकरिता त्याला मूल्यांची जाणीव ठेवावीच लागेल. अधिकार व मूल्य यांच्यात सामंजस्य प्रस्थापित करावे लागेल. केवळ पुस्तकी ज्ञानाने साध्य होणारी ही बाब नाही. त्याकरिता मानवी जीवनाच्या प्रत्येक टप्प्यावर मानव अधिकाराची निश्चिती करून तद्नुसार शिक्षणाचे त्या प्रती कर्तव्य काय, त्याचप्रमाणे प्रत्येक टप्प्यावर स्वतःचा क्रमविकास साधण्याकरिता व्यक्तीचे कर्तव्य काय, याची जाणीव करून देण्याची आवश्यकता आहे.

U.N. Vienna Declaration on Human Rights 1993 नुसार जर खऱ्या अर्थाने Democracy, Peace, Development व Social Justice हे ध्येय साध्य करायचे असेल तर सर्वप्रथम व्यक्तीला त्याच्या आध्यात्मिक अधिकाराची जाणीव करून द्यायला हवी. त्यायोगे त्याची चित्तशुद्धी होऊन त्याच्या जाणीवा सर्वव्यापक होतील व 'वसुधैव कुटुम्बकम्' या भावनेची निर्मिती होऊन एका आदर्श समाजाची स्थापना होईल.